महत्त्वाचे

प्रिन्स हॅरी यांच्या पत्नी, मुलांना राज्याभिषेक सोहळ्यात स्थान नाही

लंडन : ब्रिटनचे राजे चार्ल्स यांच्या राज्याभिषेक सोहळ्यात त्यांचे पुत्र आणि ड्यूक ऑफ ससेक्स राजकुमार हॅरी सहभागी होणार आहेत. मात्र, त्यांच्या पत्नी डचेस ऑफ ससेक्स मेघन मार्केल या सोहळ्यात सहभागी होणार नाही. राजकुमार पत्नी आणि मुलांशिवाय या सोहळ्यात सहभागी होतील, असे बकिंघम पॅलेसकडून सांगण्यात आले आहे. 'द मिरर'मधील वृत्तानुसार सोहळ्यादरम्यान हॅरी यांना बाल्कनीतही उभे राहता येणार नाही. किंग चार्ल्स यांच्या राज्याभिषेक दिनालाच हॅरींचा मुलगा राजकुमार आर्ची याचा चौथा वाढदिवस आहे. आर्ची आईसह अमेरिकेत असेल. राजकुमार हॅरींचे वादग्रस्त पुस्तक स्पेअर प्रकाशित झाल्यानंतर त्यांना राजघराण्याने वाळीत टाकले होते.

आंध्रच्या मुख्यमंत्र्यांचे पोस्टर फाडले; कुत्र्यावर गुन्हा

अमरावती : आंध्र प्रदेशमध्ये मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांचे पोस्टर फाडल्याप्रकरणी दसरी उदयश्री या तेलगू देसम समर्थक महिलेने दिलेल्या तक्रारीवरून विजयवाडा पोलिसांत एका कुत्र्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुत्र्याने आधी रेड्डी यांचे भिंतीवरील पोस्टर काढले आणि नंतर ते फाडले. रेड्डी यांच्याबद्दल मला अत्यंत आदर असल्याने या कुत्र्याने केलेला त्यांचा अपमान मला सहन झालेला नाही, असे तक्रारदार महिलेने म्हटले आहे.

कारचालकाने नेले पोलिसाला फरफटत

लुधियाना : मोबाईल फोनवर बोलत असलेल्या कारचालकाला वाहतूक पोलिसाने हटकल्यानंतर त्याचा राग आल्याने कारचालकाने पोलिसाला बोनेटवरून एक कि.मी.पर्यंत फरफटत नेले. हरदीप सिंग यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. अखेर चालकाने एक कट मारत हरदीप यांना खाली पाडले व पळून गेला. मुकुल मोंटू असे आरोपीचे नाव आहे.

पहिला हायस्पीड टेस्टिंग रेल्वे ट्रॅक होतोय तयार

देशात ताशी २२० कि.मी. वेगाने धावणार गाड्या

जयपूर : वृत्तसंस्था

भारतीय रेल्वे देशातील हायस्पीड ट्रेनसाठी राजस्थानातील जोधपूरलगतच्या गुढा-थथाना मिठाडी या लहान स्थानकांदरम्यान हा ५९ कि. मी. चा हायस्पीड टेस्टिंग ट्रॅक तयार होत आहे. या ट्रॅकवर ताशी २२० कि.मी. वेगाने धावणाऱ्या गाड्यांची चाचणी होईल.

- रुळावर येणार अल्युमिनियमच्या १०० रेल्वे गाड्या
- महत्त्वाकांक्षी हायस्पीड वंदे भारत एक्स्प्रेस
- ...तर भारत ठरणार अशा प्रकारचा पहिला देश
- यंदाच पूर्ण होणार पहिला टप्पा

"हायस्पीड टेस्ट ट्रॅक बनवण्याचा प्रकल्प एक चांगली सुरुवात आहे. २०० वर स्पीड मिळवायचा तर आपल्याला दिल्ली-मुंबई आणि दिल्ली-हावडा या प्रमुख मार्गांचेही ट्रॅक अपडेट करावे लागतील.
- **सुधांशू मणी,** इनोव्हेटर, वंदे भारत एक्स्प्रेस

वंदे भारत एक्स्प्रेससह अन्य हायस्पीड गाड्यांचा त्यात समावेश असेल. चाचणी केली जाईल. पहिल्या टप्प्यातील हायस्पीड टेस्ट ट्रॅकचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण केले जाईल. दुसरा टप्पा डिसेंबर २०१४ पर्यंत पूर्ण होईल.

चाचणी ट्रॅक प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, रोलिंग स्टॉकसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची चाचणी सुविधा असलेला भारत हा जगातील पहिला देश ठरेल, हे विशेष!

'वंदे भारत'चे ५ अभिमानबिंदू!

१ या रेल्वेचे डिझाईन तसेच तंत्र पूर्णपणे देशी (भारतीय) आहे.

२ पहिली वंदे भारत सातत्याने ४ वर्षे सेवा देते आहे.

३ विदेशातील खर्चापेक्षा ६० टक्के कमी खर्चात ती बनते आहे.

४ विदेशात एका गाडीला ३ वर्षे लागतात. आपल्याला १८ महिने.

५ अपघात झाल्यास प्रवासी सुरक्षित राहतील, असा पुढील भाग.

रोलिंग स्टॉक म्हणजे काय?

- रेल्वेमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वप्रकारच्या डब्यांना रोलिंग स्टॉक म्हणतात.
- मालगाड्यांतील प्रवासी डबे आणि व्हॅगन यांनाही रोलिंग स्टॉक असेच म्हटले जाते.

२३ कि.मी. हायस्पीड रेल्वे ट्रॅकची मुख्य लाईन

२० कि.मी. कर्व्ह टेस्टिंग लूप मिश्रीमध्ये असेल

१३ कि.मी. चा हायस्पीड लूप गुढा येथे

०३ कि.मी. चा क्वीक टेस्टिंग लूप असेल

३१.५ कि.मी. हायस्पीड स्ट्रेचचे काम सुरू

नव्या ट्रॅकची गरज का?

- रेल्वे पहिल्यांदाच ॲल्युमिनियमच्या १०० वंदे भारत एक्स्प्रेस बनवते आहे.
- सध्या भारतीय रेल्वे स्टेनलेस स्टीलच्या गाड्या तयार करते.
- अलीकडेच वंदे भारत एक्स्प्रेससाठी ३० हजार कोटींच्या निविदा जारी झाल्या आहेत.
- ॲल्युमिनियमच्या गाड्या स्टेनलेस स्टीलच्या गाड्यांपेक्षा हलक्या असतात.
- ...अन् म्हणून त्या ताशी २०० कि.मी.हून अधिक वेगाने धावू शकतात.

मलय मुस्लिमांना फ्री मिठाई, भारतीय मुस्लिमांना मनाई

विरोधानंतर सिंगापूरच्या 'फेअर प्राईज'कडून क्षमायाचना

● या मुस्लिम कुटुंबाला ते मूळ भारतीय आहेत म्हणून अपमानित करण्यात आले होते.

सिंगापूर : वृत्तसंस्था

सिंगापुरातील एका सुपरमार्केटमध्ये फेअर प्राईजने भारतीय मूळ मुस्लिम कुटुंबाला पवित्र रमजान महिन्यानिमित्त आयोजित उपक्रमात विनामूल्य मिठाई देण्यास थेट नकार दिला. फेअर प्राईजचा कर्मचारी म्हणाला, हा उपक्रम केवळ मलय मुस्लिमांसाठीच आहे. इतरांनाही देऊ एकवेळ; पण भारतीयांना एक तुकडाही मिळणार नाही, असे या कुटुंबाला तेथील कर्मचाऱ्याने सांगितले. एवढे करून तो थांबला नाही. निघा इथून, असे निक्षून सांगितले व भारतीय मुस्लिम कुटुंबाला पुढे एकक्षणही त्याने तेथे थांबू दिले नाही.

जहांबर सालेह (वय ३६) हे त्यांची पत्नी फराह नादिया आणि २ मुलांसह नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेसच्या एका सुपरमार्केटमध्ये गेले होते. या मार्केटमध्ये रमजानच्या मुहूर्तावर फेअर प्राईजच्या एका दुकानाचे (आऊटलेटचे) उद्घाटन होते आणि त्यानिमित्त मुस्लिम बांधवांना रोजा (उपवास) सोडण्यासाठी विनामूल्य मिठाई वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला होता. त्याबद्दल सर्व मुस्लिमांसाठी, अशा शब्दांत जाहिरातही करण्यात आली होती. ती पाहून हे मूळ भारतीय मुस्लिम कुटुंब येथे आले आणि त्यांच्या वाट्याला अपमान आला.

फराह नादिया यांनी फेअर प्राईजचे चित्र सोशल मीडियावर शेअर केले. जहांबर सालेह यांनीही संपूर्ण घटना समाजमाध्यमांतून कथन केली. ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर कंपनीच्या विरोधात प्रतिक्रिया येऊ लागल्या. कंपनीने नंतर क्षमायाचना केली. सर्व मुस्लिमांसाठी आमचा हा उपक्रम होता. आम्ही भारतीयांना कमी लेखत नाही. कंपनीने जहांबर सालेह कुटुंबाशीही संपर्क केला. रमजानमध्ये इफ्तार पॅक्स सर्व मुस्लिम ग्राहकांसाठी आहेत, याचा पुनरुच्चार कंपनीने केला व संबंधित कर्मचाऱ्याला समज देण्यात आल्याचेही स्पष्ट केले.

...तर रामनवमीच्या शोभायात्रेवर हल्ल्याचे कुणीच धाडस करणार नाही

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा : ममता सरकारवर जोरदार टीका

कोलकाता : वृत्तसंस्था

२०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला विजयी केल्यास रामनवमीनिमित्त काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेवर हल्ला करण्याची कुणीच हिंमत करणार नाही, असे प्रतिपादन केंद्रीय ग्रहमंत्री अमित शहा यांनी केले.

पश्चिम बंगालमधील बीरभूम येथे शुक्रवारी झालेल्या जाहीर सभेत केंद्रीय ग्रहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व भाचा अभिषेक बॅनर्जी यांच्यावर जोरदार टीका केली. बॅनर्जी हे लोक जनतेसाठी काम करत नाहीत. ते पुढे म्हणाले, दीदी आणि भाचा यांच्या अत्याचारापासून मुक्त होण्यासाठी भाजपला विजयी करण्यास हातभार लावावा. बंगालमध्ये होणारी घुसखोरी आणि तस्करी रोखण्यासाठी २०२४ मध्ये भाजपला विजयी करावेच लागेल. बंगालच्या जनतेच्या हितासाठी दीदी काम करत नाहीत, तर त्यांचे लक्ष्य भाच्याला मुख्यमंत्री करावयाचे आहे.

२०२४ मध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान बनतील, असा दावा करून शहा म्हणाले की, भाजपला जनतेचा वाढता पाठिंबा मिळत आहे. याचे कारण म्हणजे आम्ही जनतेच्या विकासासाठी काम केले आहे आणि करतच राहणार आहोत.

...तर ममता सरकार कोसळेल



शहा म्हणाले की, ममता बॅनर्जी व अभिषेक बॅनर्जी यांचा अत्याचार दूर करण्यासाठी भाजपला विजयी करावे लागणार आहे. २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला ३५ जागांवर निवडून द्यावे म्हणजे २०२५ च्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीची गरजच भासणार नाही. कारण त्यापूर्वीच ममता सरकार कोसळेल.

टेक्सास डेअरीत स्फोटामुळे १८ हजार गायींचा मृत्यू!

प्रचंड हानी : उपकरणातील त्रुटीमुळे दुर्घटना

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था

अमेरिकेतील पश्चिम टेक्सासमध्ये एका डेअरी फार्ममध्ये झालेल्या स्फोटामुळे आग लागली व या आगीत १८ हजारांवर गायींचा होरपळून मृत्यू झाला. अमेरिकेत इतक्या मोठ्या संख्येने गायींच्या मृत्यूची ही पहिलीच घटना आहे. दूध काढण्याची वेळ झाल्याने दुग्धदोहन वाड्यात एकाच वेळी या सर्व गायी बांधण्यात आल्या होत्या आणि नेमका याचवेळी स्फोट झाल्याने दुर्घटनेची तीव्रता वाढली.

डिमिट शहरातील डेअरी उत्पादन क्षेत्रातील बडी कंपनी म्हणून विख्यात असलेल्या साऊथ फोर्क डेअरी फार्ममध्ये ही दुर्घटना घडली. स्फोट इतका भयंकर होता की, जवळपास तासभर डेअरी फार्मवर आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोळ कायम होते. फार्ममधील एक कर्मचारी किरकोळ जखमी झाला आहे. त्याची प्रकृती स्थिर आहे, असे रुग्णालयातील सूत्रांकडून सांगण्यात आले. अग्निशमन विभागाने अनेक गायींनाही वाचविले.

स्फोटामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. डेअरी फार्ममधील यंत्रणेतील बिघाड हे या स्फोटाचे कारण असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. टेक्सास अग्निशमन विभागाचे अधिकारी या स्फोटामागचे नेमके कारण शोधत आहेत.

एका गायीची किंमत दीड लाखावर

- होलस्टीन आणि जर्सी अशा संमिश्र प्रजातीच्या या गायी होत्या.
- डेअरी फार्ममधील जवळपास ९० टक्के गायी या आगीने संपवल्या.
- भारतीय चलनानुसार गायीची किंमत प्रत्येकी १ लाख ६३ हजार रुपये आहे.

सरकार एआयवर करणार २० कोटी डॉलर्स खर्च

माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांचे प्रतिपादन

बंगळूर : वृत्तसंस्था

ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्मला अधिक सुलभ बनवणारी आर्टिफिशियल इंटेलिजेंट (एआय) परिसंस्था विकसित करण्यासाठी केंद्र सरकार सुमारे २० कोटी डॉलर खर्च करेल, असे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी येथील एका चर्चासत्रात सांगितले.

भारत स्टॅक, लँग्वेज मॉडेल डिजिटल इंडिया भाषिणी आणि हेल्थकेअर यांच्या गव्हर्नन्स ॲप्लिकेशन्ससाठी एआय वापरण्यास प्राधान्य दिले जाईल, तसेच खासगी क्षेत्र आणि स्टार्ट ॲप्सना एआय वापर विकसित करण्यासाठी सरकार प्रोत्साहित करेल, हेही त्यांनी नमूद केले.

इंडिया स्टॅकमध्ये आधार, युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) आणि डिजिलॉकर यांसारख्या सरकारी-समर्थित सेवांचे ओपन-सोर्स सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) समाविष्ट आहेत. ओपन-सोर्स मॉडेलमध्ये कॉम्प्युटर भाषा, आर्किटेक्चर, एपीआय, लायब्ररी किंवा लेक्सिकॉन्स, यूजर इंटरफेस आणि ॲप्सचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

मोझांबिकमध्ये भारतात तयार झालेली रेल्वे सेवेत दाखल

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केला प्रवास

मापुतो : वृत्तसंस्था

भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मोझांबिकमध्ये प्रवाशांच्या सेवेत दाखल झालेल्या भारतीय बनावटीच्या रेल्वेने प्रवास केला.

जयशंकर तीन दिवसांच्या मोझांबिकच्या दौऱ्यावर आहेत. तेथे त्यांनी मोझांबिकचे परिवहन मंत्री मॅटीयस मगाला यांच्यासोबत मेड इन इंडिया रेल्वेने प्रवास केला. भारताने मोझांबिकला रेल्वेची इंजिने व डबे पुरवले आहेत. या वेळी जयशंकर यांनी मोझांबिकच्या रेल्वे जाळ्याचा विकास आणि इलेक्ट्रिक आधारित वाहतूक आणि जलवाहतूक या क्षेत्रात भारत भागीदार होण्यास तयार आहे, असे सांगितले. आपल्या दौऱ्यात जयशंकर यांनी मोझांबिकच्या संसद अध्यक्षांची भेट घेतली व द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर भर दिला.

मोझांबिकचे परिवहनमंत्री मगाला यांनी जयशंकर यांच्यासोबतच्या रेल्वे प्रवासाचा फोटो व माहिती ट्विट करीत चर्चा समाधानकारक आणि सकारात्मक झाल्याचे म्हटले आहे.

पुढारी Classified is Now Simplified... छोजा फक्त एका क्लिकवर Click classified.pudhari.news

पाहिजेत

घरी बसून मोबाईल द्वारा रजिस्टर्डकाम करण्यासाठी मुले, मुर्लीची आवश्यकता आहे. मिसकॉल-०२२४०३७५७२०.

कंपनीसाठी घरबसल्या ३ ते ४ तास काम करा. महिना २० ह. कमवा. मो-९८६७४३५७१६, ९०८२१२४८९८.

मुंबई / दिल्लीमध्ये घरकामासाठी बेबीकेअर जापाबाई कुर्कीगसाठी बायका मुली पाहिजेत संपर्क-८९२८०५७२१७, ९१३६८६५८०४

एम.एस.सिक्युरिटी अँड फॅसिलिटी सर्व्हिसेस उलवे नवी मुंबई येथे सिक्युरिटी गार्ड त्वरीत पाहिजेत किमान १०वी पास उंची साडे पाच फूट वयोमर्यादा २५ ते ५० वर्षे पत्ता - शॉप नं. १, प्लॉट नं. ९२ सेक्टर-२ उलवे ९१३७५१५९५०, ९३२११२१९३३

व्यवसाय

एलईडी लाईट प्रॉडक्टची एजन्सी घेऊन महिना ३ ते ५ लाख पर्यंत कमवा. तसेच एरिया सेल्स मॅनेजर पाहिजे. कर्ज सुविधा उपलब्ध. सेवरी संपर्क-९५२९३०३८८४.

वाचकांसाठी निवेदन

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन प्रा. लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

विवाह

वधु ५२ एम.ए. गव्हें. जॉब प. ८३ह. मिस्टर पे. २४ह. घर आंतरजातीय लग्न चालेल. ९०४९३७२६५४, ७८४१०५८५३५.

वधु ३०, अकौंटंट प.३०ह. जात मराठा. जातीची, वयाची अट नाही. शेती. ९४०३६५६२५७, ९४०४४७६८१६.

वर पाहिजे. वधु वय २८, शि.१२वी उंची ५.३ लहान मुलांचे क्लासेस घेते. पगार १५०००/ आई वडील नाही. समजूतदार मुलगा हवा. त्वरित विवाह. ८२६३८१७७५३.

गरीब कुटुंबातील संस्करी व घरगुती मुलगी आहे. वर पाहिजे वधु वय २८, उंची ५.४, शि.९वी. मुलीला सर्व शेतीकामे जमतात. २ एकर शेती आहे. शिक्षण, नोकरी अट नाही. गरीब व शेतकरी मुलगा चालेल. ८४६८९५९७६७, ९०२१५४९२०३.

प्लॉट/फ्लॅट

इस्लामपूर येथे मध्यवर्ती ठिकाणी प्रीमिअम ऑफिसेस,शॉप्स व फ्लॅटस् रेरा रजि. सह बुकिंग सुरू तसेच विद्या प्रसाद कॉलनी येथे १ आर के,१ बीएचके रेडी पझेशन फ्लॅटस् मोजकेच उपलब्ध. खास गुढीपाडव्या निमित्त पार्किंग व रजिस्ट्रेशन फ्री. मो ७६६६७२५०७७

शब्दकोडे क्रमांक १९५४

१	२	३	■	४	५	६	७
८			९	■	१०		
■		■	११		■	१२	
१३	■	१४		■	१५		
१६	१७		■	१८		■	
१९		■	२०		■	२१	■
२२		२३	■	२४	२५		२६
२७				■	२८		

आडवे शब्द : १) वाईट; नासलेले; बिघडलेले, ४) खरडपट्टी, वपन, ८) चापट, थप्पड, १०) बहर; मौज, रंग; पराकाष्ठा, ११) एक चर्मवाद्य, १२) लीन, शरण आलेला, १४) साद, आरोळी, १५) ओतकाम करणारा, १६) उपस्थित, १८) कोल्हापुरी दागिना, १९) शंकर; प्रत्येक, २०) उपकार, २२) अपेष्टा, त्रास, वेदना, २४) पाठवणी, २७) भाजीपाला, २८) वारंवार, नित्य.

उभे शब्द : १) ढीग, रास, २) मासे पकडण्यासाठी बांधून ठेवलेले जाळे, ३) ठिक, चांगला; सुमार, ५) उत्तर; जबानी, ६) मोठेपणा, माहात्म्य, ७) टवटवीत, तजेलदार; प्रसन्न, ९) मऊ नसलेले, टणक; कठोर, १३) जन्मभर, १४) फुलांची माळ, १५) तेज, चमक, १७) अटीची भाषा, १८) समुद्र, २१) सचोटी, प्रामाणिकपणा, २३) चौक; जकातीचे ठिकाण, २५) गंध; राहणे, २६) गाणे.

शब्दकोडे क्रमांक १९५३ चे उत्तर : आडवे शब्द : १) मनगट, ४) कासव, ६) मजल, ७) गळ, ८) तार, ९) पार, १०) कान, १२) मशाल, १४) पावन, १७) कव, १८) गाव, १९) माल, २०) वारा, २१) कालवा, २२) सतत, २३) लवकर. **उभे शब्द :** १) मनमानी, २) नजर, ३) गल, ४) काळ, ५) वजन, ७) गरम, १०) काल, ११) हाव, १३) शाप, १४) पाव, १५) नगारा, १६) तलवार, १७) कळस, १९) मालक, २०) वात, २१) काव.

सुडोकू क्र. ३३०३

३			
	४		
		१	
			१

कसे सोडवाल सुडोकू? सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

उत्तर क्र. ३३०२

२	३	४	१
३	१	२	४
१	४	३	२
४	२	१	३

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24–परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: रायगड

L&T Financial Services

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह–कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 12.04.2023 नुसार (रुपयांमध्ये)	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. देवराम पुसाराम सोलंकी 2. मंजुदेवी देवाराम 3. प्रकाश पुसारामजी सोलंकी	मालमत्तेचा पत्ता : दुकान क्र. 33, तळमजला, इमारत क्र.2, 'शीव कल्पतरु आर्केड' प्लॉट क्र. 1, सेक्टर क्र. 17, गाव कामोठे, फेज – 2, ता. पनवेल, जि – रायगड, अधिमापन 348.08 चौ.फू. आणि चार्जेबल लॉफ्ट क्षेत्रफळ अधिमापन 115 चौ.फू. आणि त्याजवळपास सीमारेषा पूर्व: प्लॉट क्र 9, 10 आणि 11 पश्चिम: 32 मीटर रुंद रस्ता उत्तर: प्लॉट क्र. 4, 5, 6 आणि 7 दक्षिण: प्लॉट क्र. 2	MUMHL14001889	25 नोव्हेंबर 2022	रु. 6,25,824/–	रु. 33,00,690.99/–	रु. 62,58,240/–	26/04/2023	04/05/2023

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **02/05/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **04/05/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **06/05/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : प्रशांत पाटील, एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098 आणि अंकित विग, संपर्क क्र. 8668943242, एल अँड टी फायनान्स लि, ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 15.04.2023
ठिकाण: रायगड

स्वाक्षरी/–
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड